# पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,
पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दूरध्वनी क्रमांक ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


---

**प्रेसनोट** दिनांक :- ३१/०८/२०२३

## ग्रामीण पोलीसांचे अंमली पदार्थ विरोधी अभियान
## १० गुन्हे दाखल, १४ आरोपींना अटक

## गणेशोत्सवाचे पार्श्वभूमीवर अवैध व्यवसाय विरोधी कारवाया आणखी तीव्र करणार

---

दिनांक ०६ ते ३१ ऑगस्ट २०२३ दरम्यान नाशिक ग्रामीण पोलीसांनी अंमली पदार्थ विरोधी अभियान राबवले होते.

नाशिक ग्रामीण घटकात पोलीसांनी अंमली पदार्थ शोधण्याकामी व्यापक मोहीम राबवली होती. सदर कालावधीत एकूण १० कारवाया झाल्या असून यात एकूण १४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीतांकडून सुमारे १२ किलो गांजा व २३०५ अल्प्राझोलम गोळया असा एकूण १,६८,१३६/- रू. किं.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर कारवाया मालेगाव मधील पवारवाडी, किल्ला, मालेगाव शहर या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत तर नाशिक तालुका, चांदवड, सायखेडा, सिन्नर, सिन्नर एमआयडीसी व वावी या इतर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत करण्यात आल्या आहेत. सदर आरोपीतांविरूध्द अंमली औषधी द्रव्ये व मन:प्रभावी पदार्थ अधिनियम १९८५ (NDPS) या कायद्यखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांत अटक करण्यात आलेल्या आरोपीतांपैकी ०३ आरोपी अद्यापही पोलीस कोठडीत असून पोलीस त्यांचेकडे कसून तपास करत आहेत.

नाशिक ग्रामीण पोलीसांनी अवैध व्यवसाय विरुद्ध सुरु केलेले हे अभियान यापुढेही अव्याहतपणे सुरू राहील. गणेशोत्सवाचे पार्श्वभूमीवर, दिनांक १ सप्टेंबर ते १५ सप्टेंबर या कालावधीत नाशिक ग्रामीण पोलीस सर्वच अवैध व्यवसायाविरुद्धची आपली मोहीम आणखी तीव्र करणार आहेत.

नागरिकांना अवैध व्यवसायांविषयी काही माहिती असल्यास, त्यांनी ती नाशिक ग्रामीण पोलीसांच्या हेल्पलाइन क्रमांक **६२६२ २५ ६३६३** यावर द्यावी व अवैध व्यवसायांच्या उच्चाटनासाठी पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.